24

# महिला सक्षमीकरण आणि नोकरदार महिलांच्या समस्या

**श्वेता कल्याणकर**
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद
Email-shwetarkalyankar93@gmail.com

**महिला सक्षमीकरण संकल्पना :**

महिलांच्या संदर्भात 'सक्षमीकरण' हा शब्द मागील दशका पासून वापरला जातो. परंतु त्याला खऱ्या अर्थाने सन १९६५पासून महिला मुक्तीच्या चळवळींमुळे आंतरराष्ट्रीय व्यासपिठावर चर्चीले जात आहे. त्यामुळेच सन १९८५ मध्ये नैरोबी येथे भरलेल्या 'आंतरराष्ट्रीय महीला परिषदेत' 'महिलांना पुरुषांबरोबर कायदेशिर,राजकिय आर्थीक, सामाजिक क्षेत्रात तसेच शारीरिक, मानसिक व त्यांच्या कुटूंबात अथवा समुदायात आणि शब्दांच्या सांस्कृतिक पार्श्वभूमिमध्ये निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य व स्वातंत्रता दिली जावी' अशी घोषणा करण्यात आली.'

असे असुनही भांडवलशाहीच्या पहिल्या टप्यापासून सुरु झालेली महिला शोषण थांबण्याऐवजी ते वाढतच चाललेले दिसून येते. बाजरपेठीय व्यवस्थेत महिला अत्याचार व महिला परिश्रम या दोन्ही बाबींना विद्रुप रुप प्रकट झालेल आहे. महिलांच्या बाबतीत असणारी मागासपणाची संकल्पना आणि विकास प्रक्रियेशी आंतरराष्ट्रीय भांडवलशाही व्यवस्थेशी असणारा घनिष्ठ संबंध पाहता जागतिक पातळीवर शोषण व्यवस्थेचा महिलांच्या दडपणुकीशी बुसा संबंध असतो ही बाब सर्वप्रथम लक्षात घेणे आवश्यक आहे.

महिलांच्या दुर्बलीकरणात एका बाजुने अनेक शतकांपासून चालत आलेली कौटूंबिक पारंपारीक समाजरचना, धार्मीक मूलतत्ववाद आणि आक्रमक राष्ट्रवाद तर दुसऱ्या बाजुला उत्पादना मधील होणारे बदल व परिवर्तन या बाबी भर घालीत आहेत. महिलांचे जीवन असह्य करण्यात त्या-त्या देशाची समाज रचना आणि तेथील वातावरणाचाही सहभाग असतो. हे आता निश्चीत झालेले आहे.

माहिलांच्या संदर्भात महिला मुक्ताता' म्हणजे 'महिला सक्षमीकरण' असाही अर्थ घेतला जातो. यासाठी शासन व्यवस्थेच्या माध्यमातून कायदे बदलून घेतले जातात. परंतु, महिला सक्षमीकरण ही बाब 'महिला मुक्तता' या संकल्पनेपेक्षा वेगळी आहे. उदा- निजामाच्या नियंत्रणातून मराठवाडा मुक्त झाला. याचा अर्थ तो 'सक्षम' झाला असा नव्हे, तर तेथे शासनाने राबवलेल्या योजना, कार्यक्रम व धोरणे आणि आर्थिक संरचनात्मक फेरबदलयामुळे तो सक्षम बनेल. मॅक आयव्हर यांच्या सारख्या समाजशास्त्रज्ञांच्या मते 'सक्षमीकरण म्हणजे' 'आजच्या राजकीय, आर्थिक व्यवस्थेत निर्बलांची कार्यक्षेत्रे दिवसेंदिवस संकोच पावत असल्या कारणाने प्रत्येक जण विकासाची समान उर्जा आणि इच्छशक्ती निसर्गत:च बाळगत असतात. त्यांना फक्त त्यासाठी अनुकूल वातावरण आणि समान संधी व साधने उपलब्ध करुन देणे म्हणजेच एखाद्यावर असलेल्या विशिष्ठ बाबींचा प्रभाव, दडपणुक,अन्याय किंवा अत्याचार दूरकरणे होय.'

"Empowerment therefore is the process aimed at changing the direction of systematic forces which marginalize women and other disadvantages section in a given contort"

जगातील सर्व समाजातील महीला पुरुष भेदभाव कमी करण्याचे साधन या रुपात महीला सक्षमीकरणाला पाहीले जाते. त्यासाठी पुरुषांनी महिलांवर होणारे अत्याचार व अन्यायाला वाचा फोडून परंपरागत अटींवर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. अर्थात, कमकुवत घटकांतील महिलांना आपल्या जिवनातील परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी योग्य ती संधी देणे याचा अर्थ केवळ हे संसाधनातील वाटप नाही, तर त्यांच्या आत्मविश्वासात झालेली वृध्दी आणि पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करणे असा आहे महिला सक्षमीकरणाचा अर्थ महिलांना आर्थीक बाबतीत स्वावलंबी, आत्मविश्वासाप्रती अस्मिता, अवघड व वाईट परिस्थितीतही सकारात्मक विचार करुन तिला तोंड देण्यास सक्षम बनविणे आणि विकास कार्यात त्यांचा सहभाग निर्माण करुन निर्णय घेण्यासाठी एका परिपक्व सशक्त महिलेची निर्मिती करणे असा करता येईल.अर्थात, महिलांच्या मनात आत्मविश्वास, आपाल्या अधिकारांच्या प्रती जागृती तसेच अन्यायाशी लढण्याची नैतीक ताकद व क्षमता प्राप्त होणे, जेणेकरुन आपल्यावर होणाऱ्या आर्थीक, सामाजिक तसेचे पारंपारिक भेदभावांना ओळखून त्यांचा प्रतिकार करेल अशी महिला तयार करणे म्हण्जो ‘महिला सक्षमीकरण’ होय.

**संशोधन पध्दती :**

‘महिला सक्षमीकरण आणि नोकरदार महिलांच्या समस्या’ या प्रस्तुत प्रबंधातील संशोधन पदती ही वर्णनात्मक, चर्चात्मक पध्दतीचा उपयोग करुन संशोधन केलेले आहे.

**उद्दीष्टये :**

- महिला सक्षमीकरणातून राष्ट्र विकासाचे उद्देश साध्यकरणे
- स्त्रियांचे खच्चीकरण थांबविणे.
- सर्वच क्षेत्रांमध्ये स्त्रियांना समान संधी प्राप्त व्हावी.
- स्त्रियांना आर्थीक आणि सामाजिक न्यायमिळवून देणे.

**आधुनिक स्त्रीचे अर्थार्जन आणि समस्या :**

आधुनिक काळात होत गेलेले बदल समाजसुधारणा यातून स्त्रीला विकास होण्याास मदत झाली. नोकरी करुन किंवा व्यवसाय करुन शिकलेली तसेच अशिक्षित स्त्री देखील आपल्या संसाराला हातभार लावतांना दिसते. त्यातुनच स्त्रीच्या कर्तृत्वाची दिशा व्यापक होण्याला मोठी संधी उपलब्ध झाली. केवळ गृहिणी म्हणून वावरणाऱ्या स्त्रीचे प्रापंचिक आयुष्य नोकरी करणाऱ्या स्त्रीपेक्षा वेगळे दिसते. गृहिणी नोकरी करीत नाही परंतु कुटूंब सांभाळणे, बाजारहाट, मुलांचा अभ्यास घेणे, गृहस्वच्छता बालसंगोपन करीत असते. या कामाचे मोल पैशात करता येत नाही. नोकरी करणाऱ्या स्त्रीला घर व नोकरी सांभाळतांना तारेवरची कसरत करावी लागते. असे चित्र सर्वत्र दिसते. स्त्री नोकरी करण्यासाठी किंवा अर्थार्जन करण्यासाठी प्रयत्न करत. त्यात ८% स्त्रिया सर्व कुटूंबाच्या सुखाच्या राहणीमानाचा व भविष्याचा विचार करुन अर्थार्जन करीत असतात. स्त्री कितीही शिकली कमाऊ लागली किंवा तीला कितीही अधिकार प्राप्त झाले तरी तिचे लक्ष आपल्या घराकडे संसारात असते. पूर्वीची एकत्र कुटूंब पध्दती एकत्र कुटूंब पध्दती आज जवळ जवह नामशेष होत चाललेली आहे. विभक्त कुटूंब पध्दती लोकप्रिय व प्रचलित आहे. अशा परिस्थितीत घरातील पती व पत्नी दोघेही नोकरी करत असल्यास त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. मुलांच्या संगोपनाचा प्रश्न सोडवावा लागतो. याशिवाय घरातील एखाद्याचे आजारपण स्वत:ची प्रकृतीकडे लक्ष द्यावे लागते. नोकरी म्हटली की त्यांचे नियम शिस्त व विशिष्ठ आचारसंहिता पाळणे अपरिहार्य ठरते. नोकरी करणाऱ्या स्त्रीला त्यातल्या त्यात तरुण, सुंदर स्त्रीला एखाद्या सहकाऱ्यांच्या, वरिष्ठांच्या वाईट नजरेला तोंड द्यावे लागते. स्त्रीच्या कामाला दर्जा जितक्या खालच्या स्तराकड येतो. (उदा. शेतमजुर, कामगार, मोलकरीण इ.) तेवढा हा धोका वाढतो. एखाद्या उच्चशिक्षित स्त्रीच्या हाती सत्ता व अधिकार आल्यावर प्रथत तिच्या कर्तृत्वाकडे साशंकतेने

पाहीले जाते. स्त्रीच्या हाताखाली काम करण्याचे एखाद्या पुरुषाला कमी पणाचे वाटून त्यांच्या कडुन थोडाफार असहकार होतो.त्याला तोंड देवून स्त्रीला पुढे जावे लागते.

स्त्री अर्थार्जन करीत असली तरी आपली मिळकत कशी कारणी लावावी याचे पूर्णपणे स्वातंत्र्य असतेच असे नाही. या बाबत पतीचा सल्ला मानावाच लागतो नाहीतर त्याचे दुष्परिणाम कुटूंबात जाणवतात. काही घरात मुलाला साजेशी चांगली शिकलेली मुलगी सुन म्हणून घरात आणली जाते. इंजिनिअर, सी.ए. प्राध्यापक झालेल्या सुनेला कोणताही व्यवसाय करण्यास मात्र तिला परवानगी दिल्या जात नाही. सुशिक्षित स्त्री त्या आपल्या शिक्षणाचा वापर करुन अर्थार्जन करण्याचे व्यक्ती स्वातंत्र्य द्यायला हवे तिला सहकार्य करायला हवे हा विचार अद्याप समाजात पूर्णपणे रुजेला दिसून येत नाही. त्यातूनच सुशिक्षित स्त्रीला आपल्या शिक्षणाचा उपयोग करुन अर्थार्जन करायचे असेल तर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. गृहकृत्ये सांभाळुन नोकरी करणे ही तिची तारेवरची करसरत होते. तिच्या अर्थार्जनामध्ये घरातून पुर्णपणे सहकार्याची आवश्यकता असते. तसेच सामंजस्याची आवश्यकता असते.

**उपाययोजना :**

**कार्यालये, नोकरीच्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा लावणे:**

कार्यालये, नोकरीच्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा लावावीत जेणे करुन काही अनिष्ठ प्रकार गैरप्रकार टाळता येतील.

**नोकरीच्या ठिकाणी पाळणाघराची व्यवस्था :**

ज्या महीलंचे लहान मुले आहेत अशा महीलांचे लक्ष कार्यालयीन कामकाजात लागत नाही त्यामुळे नोकरीच्या ठिकाणी पाळणाघराची व्यवस्था करण्यात आली तर महीलांना सोईस्कर जाते.

**नोकरीदार महीलांच्या समस्या सोडवण्यासाठी :**

कार्यालयात संघटना/समिती स्थापावी व त्याची अंमजबजावणी महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी संघटना/ समिती स्थापन करण्यात आलेल्या आहेत. परंतु त्या सक्रिय नाहीत. किंवा महीलांनी आपल्या समस्या समितीस सांगाव्यात जेणे करुन तक्रार दिल्यानंतर त्यांची समस्या सोडवून अमलबजावणी करता येईल.

**सारांश :**

प्राचीन काळापासून स्त्री प्रश्नांचा मागोवा घेतल्यास असे दिसून येते की, 'बाईला बाईपणाच्या चौकटीत' बसविल्याने ती शिक्षणापासून वंचित राहीली. त्यामुळे कुठतरी शिक्षणाची गरज महीलांना वाटु लागली आणि महीला शिक्षण घेऊ लागल्या परंतु नोकरी करीत असतांना त्यांच्या समस्या निर्माण होतात महीलांनी सक्रीय सहभाग घेऊन धाडसीपणाने आपल्या तक्रारींचे निवारण संघटना/समितीकडून करुन घ्यावे.

**संदर्भ :**

- हिंगोले रेखा : स्त्री सक्षमीकरण आणि स्वयंसेवी संघटना
- द्विवेदी राकेश : महीला सशक्तिकरण
- Battiwala striate : Empowerment of women in south Asia.

❑❑❑